5G 09.30 AM

NSDL
Technology, Trust & Reach

टोल फ्री नंबर 1800 222 990

# दूरदर्शी गुंतवणूकदारीकरिता डिपॉझिटरी विषयाची मार्गदर्शिका

चलाख व्हा

शहाणे व्हा

डिमॅट - सध्या सोप्या स्वरूपात

# अनुक्रमणिका


## अ. मुलभूत गोष्टींपासून सुरुवात करुया 2

1. कॅपिटल मार्केट काय आहे?
2. सिक्युरिटीज म्हणजे काय? प्रायमरी आणि सेकंडरी मार्केट म्हणजे काय?
3. कॅपिटल मार्केटमधील एनएसडीएल (NSDL)ची भूमिका काय आहे?
4. एनएसडीएल (NSDL) डिमॅट खाते कसे उघडावे?
5. तुम्ही तुमचे एनएसडीएल (NSDL) डिमॅट खाते उघडल्यानंतर काय काय करू शकता?

## ब. एनएसडीएल (NSDL) डिमॅट खात्यासोबत उपलब्ध होणाऱ्या सेवा 5

1. एनएसडीएल (NSDL) स्पीड-ई सेवा
2. एनएसडीएल (NSDL) मोबाईल ॲप
3. एनएसडीएल (NSDL) आयडियाज सेवा
4. एनएसडीएल (NSDL) इ-व्होटिंग सेवा
5. एनएसडीएल (NSDL) कन्सोलिडेटेड अकाऊंट स्टेटमेंट (CAS) सेवा

## क. एक दूरदर्शी गुंतवणूकदार बनणे 7

1. तुम्ही एक दूरदर्शी गुंतवणूकदार असल्याची खात्री करा
2. तुमच्या डिमॅट खात्याची काळजी घेणे

## ड. आणखी माहिती 9

1. डिव्हिडंड / शेअर्ससाठी दावा केलेली रिफंडची रक्कम मिळाली नाही
2. सिक्युरिटीजच्या हस्तांतरणासाठी डिमॅट अनिवार्य
3. असूचीबद्ध सार्वजनिक कंपन्यांसाठी डिमॅट अनिवार्य
4. गुंतवणूकदार जागरुकता कार्यक्रम
5. तक्रार निवारण
6. इतर उपयुक्त सेवा



हे प्रकाशन NSDL इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंड चा एक पुढाकार आहे. जर तुम्हाला या पुस्तिकेत कुठलीही चुकी आढळली, तर कृपया आमच्याशी info@nsdl.co.in वर संपर्क करा.
या पुस्तिकेची इलेक्ट्रॉनिक प्रत www.nsdl.co.in वर उपलब्ध आहे

Technology, Trust & Reach

प्रिय वाचक,

एनएसडीएल (NSDL)मध्ये तुम्ही दाखविलेल्या रुचिबद्दल आम्ही 'तुमचे आभारी आहोत'.

एनएसडीएलमध्ये आम्ही असे मानतो की प्रत्येक भारतीय केवळ गुंतवणूकदार नाही, तर दूरदर्शी गुंतवणूकदार असावा. ही पुस्तिका वाचण्याच्या तुमच्या निर्णयाची आम्ही प्रशंसा करतो आणि आम्हाला खात्री आहे की तुम्हाला यात दिलेल्या माहितीचा फायदा होईल. या पुस्तिकेतील माहिती तुम्हाला एक 'दूरदर्शी गुंतवणूकदार' बनण्याच्या दिशेत पाउल उचलण्यास मदत करेल.

या पुस्तिकेत एनएसडीएल (NSDL)विषयी थोडक्यात माहिती व्यतिरिक्त, तुम्ही एनएसडीएल (N S D L) डिमॅट खाते उघडल्यानंतर, आम्ही उपलब्ध करत असलेल्या अनेक सेवांबद्दल माहिती दिली आहे. तुम्हाला जर आणखी माहिती किंवा कोणतेही स्पष्टीकरण हवे असेल तर नि:संकोच आमच्याशी संपर्क साधा.

**आपले नम्र**
**टीम एनएसडीएल**

## अ. मुलभूत गोष्टींपासून सुरुवात करूया

### 1) कॅपिटल मार्केट म्हणजे काय?

साध्या आणि सोप्या शब्दांमध्ये, कॅपिटल बाजार म्हणजे कॅपिटल किंवा निधीसाठी एक बाजारपेठ असते, ज्यात आपल्या व्यवसायासाठी पैशांची गरज असलेले लोक पैसे पुरविण्यास इच्छुक असलेल्या लोकांना शोधतात. दुसऱ्या शब्दांमध्ये, कॅपिटल मार्केट एक अशी बाजारपेठ आहे जेथे लोक विभिन्न प्रकारच्या आर्थिक साधनाच्या खरेदी आणि विक्रीत गुंतलेले असतात. हे नियामक (SEBI), स्टॉक एक्स्चेंजिस (NSE/BSE इ.), डिपॉझिटरीज (NSDL/CDSL) आणि स्टॉकब्रोकर्स, डीपीज, कस्टोडियन्स, व्यापारी बँका इत्यादींसारख्या इतर मध्यस्थांनी बनलेले असते.

### 2) सिक्युरिटीज म्हणजे काय? प्राथमिक आणि दुय्यम बाजारपेठ म्हणजे काय?

सिक्युरिटीज म्हणजे विविध प्रकारची अशी आर्थिक साधने असतात, ज्यांची कॅपिटल मार्केटमध्ये खरेदी-विक्री होते. दुसऱ्या शब्दांमध्ये सांगण्याचे झाल्यास, ही अशी साधने असतात, ज्यांच्याद्वारे कॅपिटल पुरविणाऱ्यांद्वारा भांडवलीसाठी इच्छुक असलेल्या लोकांसाठी कॅपिटल प्रस्तुत केले जाते. हे समजून घेण्यासाठी एक उदाहरण घेऊया. श्री. अ हा एबीसी लिमिटेडचा एक सुपरिचित उद्योजक आहे आणि व्यवस्थापकीय संचालक आहे. त्याला एबीसी लिमिटेड या नावासह एक नवीन सिमेंट कारखाना सुरु करायचा आहे. यासाठी त्यांना फार मोठ्या रकमेची (कॅपिटल) आवश्यकता आहे, जी तो स्वत: किंवा एबीसीएल लिमिटेड हा पैसे उभारू शकत नाहीत. त्यामुळे, तो निधीच्या मोबदल्यात त्यांच्या इक्विटी शेअर्स देवुन कॅपिटल मार्केटमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतो. मग तो इनिशियल पब्लिक ऑफर किंवा आयपीओ काढून प्रवेश करतो. (इनिशियल किंवा प्रारंभिक कारण एबीसी लिमिटेड पहिल्यांदाच जनतेकडून निधी उभारत आहे). एका स्वीकृत किमतीस देऊन जनता शेअर्ससाठी आवेदन करु शकते. उचित प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर, कंपनीला त्याच्या बँकेच्या खात्यात पैसे मिळतात आणि ती आवेदकांना शेअर्स जारी करुन त्यांना कंपनीचे शेअरहोल्डर्स बनविते.

वर वर्णन केलेले शेयर्स, एक प्रकारची सिक्युरिटीच आहे. इतर उदाहरणे आहेत – डिबेंचर्स, बॉंड्स, म्युच्युअल फंड युनिट्स, वाणिज्य कागदपत्रे, ठेवींची प्रमाणपत्रे, गव्हर्नमेंट बॉंड्स इत्यादी.

इशूअर्स द्वारा सामान्य जनतेस शेअर्स किंवा सिक्युरिटीज जारी करण्याला 'प्रायमरी मार्केट' असे म्हणतात. अगोदरच जारी केलेल्या आणि खरेदी-विक्री होत असलेल्या सिक्युरिटीजच्या व्यापारासाठी (खरेदी आणि विक्री) मार्केट असलेल्या स्टॉक एक्स्चेंजला 'सेकंडरी मार्केट' असे म्हणतात. कोणताही शेअरहोल्डर एखाद्या सेबी नोंदणीकृत स्टॉकब्रोकर किंवा दलालाद्वारा बीएसई किंवा एनएसईसारख्या स्टॉक एक्स्चेंजेसद्वारा पुरविलेल्या मंचावर आपले शेअर्स विकण्याचा प्रस्ताव करु शकतो. कोणतीही व्यक्ती स्वीकृत किमत देऊन आपल्या स्टॉकब्रोकरद्वारा हे शेअर्स खरेदी करु शकते.

### 3) कॅपिटल मार्केटमध्ये एनएसडीएल (NSDL)ची भूमिका काय आहे?

1996 मध्ये प्रस्थापित एनएसडीएल (NSDL) आज जगातील एक सर्वात मोठी व अग्रगण्य डिपॉझिटरी बनली आहे. एक डिपॉझिटरी म्हणून ती शेअर्स आणि सिक्युरिटीच्या इतर प्रकारांना इलेक्ट्रॉनिक प्रारुपात म्हणजेच, डिमटेरियलाईझ स्वरूपात ठेवण्याचे काम करते. डिमॅट खाते उघडून एखादी व्यक्ती सिक्युरिटीज इलेक्ट्रॉनिक स्वरूपात खरेदी करू शकते आणि त्याच्या/तिच्या डिमॅट खात्यातून अन्य कोणत्याही डिमॅट खात्यात सिक्युरिटीजचे हस्तांतरण करू शकते.

भारतातील कॅपिटल बाजारासाठी एनएसडीएल (NSDL)च्या योगदानाने त्याला जगातील विविध आघाड्यांवर एक अग्रगण्य कॅपिटल बाजार बनविले आहे. विविध उत्पादने आणि सेवांसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या अवलंबनासह आणि देशात सर्वत्र सेवाजाळे पसरवून एनएसडीएल (NSDL)ने गुंतवणूकदारांचा आणि इतर मध्यस्थांचा भरवसा जिंकला आहे आणि तंत्रज्ञान, विश्वास आणि आवाका या आपल्या प्रचार वाक्यास सत्यात उतरविले आहे.

एनएसडीएल (NSDL) त्याच्या 275 पेक्षा जास्त डीपीजच्या (डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स) नेटवर्कद्वारा गुंतवणूकदार, स्टॉक ब्रोकर्स, स्टॉक एक्स्चेंजीस, कस्टोडियन्स इत्यादींना अनेक सेवा पुरविते. अनेक मोठ्या बँका (राष्ट्रीयीकृत, खासगी आणि सहकारी), स्टॉक ब्रोकर्स आणि वित्तसंस्था डीपीज म्हणून एनएसडीएल (NSDL)मध्ये सामील झाल्या आहेत. एनएसडीएल (NSDL) डीपीज देखील संपूर्ण देशभरात 31,300 पेक्षा जास्त सेवा केंद्रांमधून आणि तसेच, विदेशातील काही केंद्रांमधून देखील कार्यरत आहे. एनएसडीएल (NSDL) डीपीज आणि त्यांच्या सेवा केंद्रांची यादी एनएसडीएल (NSDL) च्या वेबसाईट www.nsdl.co.in वर उपलब्ध आहे.

### 4. एनएसडीएल (NSDL) डिमॅट खाते कसे उघडावे?

डिमॅट खाते उघडणे अतिशय सोपे आहे. याकरिता तुम्हाला केवळ एनएसडीएल (NSDL) डीपीची भेट घ्यावी लागेल डीपीज तुम्हाला औपचारिकता पूर्ण करण्यास मदत करेल. तुम्हाला ओळखीचा पुरावा आणि पत्त्याचा पुरावा द्यावा लागेल. तसेच, डिमॅट खाते उघडण्यासाठी पॅन अनिवार्य आहे. सोबत तुम्हाला तुमच्या बँकेच्या खात्याचे तपशील देखील द्यावे लागतील.

तुमचे डिमॅट खाते उघडल्यानंतर, तुमचा डीपी तुम्हाला डीपीआयडी आणि क्लायंट आयडी, तुमच्या डिमॅट खात्याशी संबंधित तपशील असलेल्या तुमच्या क्लायंट मास्टर रिपोर्टची एक प्रत, शुल्क पत्रक आणि लाभार्थी मालक आणि डिपॉझिटरी पार्टिसिपंटचे हक्क आणि दायित्वे याची प्रत उपलब्ध करेल. अचूकपणे नोंदविलेल्या तुमच्या सर्व तपशिलांची खात्री करण्यासाठी तुम्ही क्लायंट मास्टर रिपोर्टची पडताळणी केली पाहिजे. तुम्हाला शेअर्सची खरेदी-विक्री (म्हणजेच, खरेदी किंवा विक्री) करावयाची असेल, तर तुम्हाला कोणत्याही एका सेबी नोंदणीकृत स्टॉकब्रोकरसोबत ट्रेडिंग / ब्रोकिंग खाते उघडण्याची देखील गरज भासेल. असे अनेक डीपीज आहेत, जे गुंतवणूकदारांच्या सेवेकरिता 3-इन-1 सेवा देऊ करतात (3-इन-1 मध्ये डिमॅट खाते, ट्रेडिंग खाते आणि बँकेचे खाते यांचे समावेश असतो).

## 5) तुम्ही तुमच्या एनएसडीएल (NSDL) डिमॅट खात्या मार्फत काय करू शकता?

तुमच्या एनएसडीएल (NSDL) डिमॅट खात्यासह तुम्ही करू शकत असलेल्या काही महत्त्वाच्या गोष्ट खाली दिल्या आहेत –

I. तुम्ही आयपीओज आणि एनएफओजसाठी अर्ज करू शकता. त्या अर्जावर तुमचा डीपी आयडी आणि क्लायेंट आयडी अचूकपणे नोंदविण्यास विसरू नका. तेच डिमॅट खाते शेअर्स खरेदी करण्यासाठी आणि त्यांना राखण्यासाठी आणि इतर प्रकारच्या सिक्युरिटीजसाठी वापरले जाऊ शकते.

II. तुम्हाला तुमच्या डिमॅट खात्यामध्ये सर्व कॉर्पोरेट लाभ (बोनस, राईट्स इश्यू, इ.) आपोआप मिळतील. तुमच्या कंपनीद्वारा घोषित लाभांशासारखे रोख लाभ, तुमच्या बंधपत्रांमधील गुंतवणुकींवरील व्याज किंवा देय परिपक्वता रक्कम, इ. तुमच्या डिमॅट खात्यासह जोडलेल्या बँकेच्या खात्यात जमा होतील. याकरिता तुमच्या डिमॅट खात्यात तुमच्या बँकेच्या खात्याचे अचूक तपशील नोंदविल्याची खात्री करा.

III. तुम्ही 'शेयर्सवर कर्ज' मिळविण्यासाठी तुमच्या डिमॅट खात्याचा वापर करू शकता. ही सुविधा गुंतवणुकी न विकता तुमच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी अनेक बँका द्वारा पुरविली जाते.

IV. तुम्ही शेअर्स, बॉंड्स, डिबेंचर्स, गव्हर्नमेंट बॉंड्स, सॉव्हरिन गोल्ड बॉंड्स इ.मधील तुमच्या गुंतवणुकी तुमच्या डीपीद्वारा कागदी स्वरूपातून डिमॅट स्वरूपात बदलू शकता.

V. तुम्ही तुमच्या म्युच्युअल फंडमधील गुंतवणुकी त्याच डिमॅट खात्यात ठेवू शकता. म्युच्युअल फंड युनिट्स डिमॅट खात्यात ठेवल्याने तुमच्यासाठी अनेक गोष्टी सोप्या होतील. तुम्ही एनएसडीएल (NSDL) सीएएसद्वारा तुमच्या पोर्टफोलिओवर लक्षं ठेवू शकता. यामुळे तुमच्या व्यक्तिगत माहितीमध्ये तुम्हाला कोणताही बदल करावयाचा असेल, उदा. पत्ता किंवा बँकेचा तपशील किंवा नामनिर्देशित व्यक्ती, इ., तर तुम्हाला विविध म्युच्युअल फंड हाउसेसशी संपर्क साधण्याची गरज राहणार नाही. तुम्ही अर्जामध्ये केवळ तुमचा डीपी आयडी आणि क्लायेंट आयडी लिहून डिमॅट स्वरूपात म्युच्युअल फंड युनिट्सना सबस्क्राईब करू शकता. तुमच्या डिमॅट खात्याद्वारे एसआयपीमार्गे म्युच्युअल फंड्समध्ये गुंतवणूक देखील शक्य आहे. म्युच्युअल फंड युनिट्सच्या विमोचनासाठी किंवा पुन:खरेदीसाठी तुम्ही तुमच्या डीपीला सूचना देऊ शकता किंवा एनएसडीएल (NSDL)ची स्पीड-इ सुविधा वापरू शकता.

VI. तुम्ही तुमच्या डिमॅट खात्याद्वारे कंपनीचे शेअर्स देऊ करत वापस खरेदीच्या प्रस्तावात (बाय बॅक) देखील सहभागी होऊ शकता.

VII. तुमचे डिमॅट खाते चालविण्यासाठी, तुम्हाला लिखित स्वरूपात तुमच्या डीपीला सूचना द्याव्या लागतील. अन्यथा, तुम्ही कोठूनही आणि कोणत्याही वेळी, तुमच्या डीपीला इलेक्ट्रॉनिकमार्गे सूचना देण्यासाठी एनएसडीएल (NSDL)ची स्पीड-ई सेवा प्राप्त करू शकता.

डिमॅटसाठी सिक्युरिटीज उपलब्ध आहेत का ते पाहण्यासाठी
https://nsdl.co.in/master_search.php या संकेतस्थळावर भेट द्या.

## ब. एनएसडीएल (NSDL) डिमॅट खात्याबरोबर दिल्या जाणाऱ्या सेवा

### 1) एनएसडीएल (NSDL) स्पीड-इ सेवा




स्पीड-इ (ज्याचे संबोधन स्पीडी असे केले जाते) एनएसडीएल (NSDL)द्वारा दिली जाणारी इंटरनेटवर आधारित एक सुविधा आहे. ही डिमॅट खातेधारकाला डिलिव्हरी, तारण आणि म्युच्युअल फंडच्या विमोचनाशी संबंधित सूचना इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देण्यास सक्षम बनविते, ज्यामुळे प्रक्रिया अतिशय जलद, सुरक्षित आणि कार्यक्षम बनते. जर डिमॅट खातेधारकाच्या डीपीने ही सेवा दिली तर तो/ती ही सुविधा प्राप्त करू शकतो/ते.

अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या, https://eservices.nsdl.com/

### 2) एनएसडीएल (NSDL) मोबाईल ॲप

एनएसडीएल (NSDL)ने व्हॅल्यूएशनसह होल्डिंगचे स्टेटमेंट पाहण्यासाठी आणि इ-व्होटिंगमध्ये कोणत्याही वेळी कुठूनही सहभागी होण्यासाठी एक मोबाईल ॲप विकसित केले आहे. तुम्ही हे गुगल प्ले स्टोअर किंवा ॲप स्टोअरमधून डाऊनलोड करू शकता आणि हे पूर्णपणे मोफत आहे.



### 3) आयडियाज सेवा:

आयडियाज व्हॅल्यूएशनसह होल्डिंगचे अलीकडील स्टेटमेंट पाहण्यासाठी आणि इ-व्होटिंगमध्ये कोणत्याही वेळी कुठूनही शेअर्स घेण्यासाठी एक इंटरनेटवर आधारित सुविधा आहे. येथे तुम्ही e-CAS पाहू शकता आणि मागील 12 महिन्यांचे e-CAS डाऊनलोड करू शकता. ही सुविधा पूर्णपणे मोफत आहे.

### 4) एनएसडीएल (NSDL) इ-व्होटिंग सेवा



एनएसडीएल (NSDL) इलेक्ट्रॉनिक व्होटिंग (इ–व्होटिंग) प्लॅटफॉर्म प्रत्येक शेअरहोल्डरला बैठकीच्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित न राहता 'ऑनलाईन' मतदानाचा हक्क बजावण्याची सुविधा देते. इ–व्होटिंग सेवा स्पीड-इ आणि एनएसडीएल (NSDL) मोबाईल ॲप अंतर्गत हि उपलब्ध आहे आहे.

अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या, https://www.evoting.nsdl.com/.

IndiaBondInfo
विविध बंधपत्रे (बॉंड) आणि ऋणपत्रे (डिबेंचर्स)ची माहिती एकाच ठिकाणी.
भेट द्या: https://www.indiabondinfo.nsdl.com

## 5) एनएसडीएल (NSDL) कन्सोलिडेटेड अकाऊंट स्टेटमेंट (CAS)

I. एनएसडीएल (NSDL) प्रत्येक डिमॅट खातेधारकाला त्याच्या डिमॅट खात्या(त्यां)साठी आणि म्युच्युअल फंड गुंतवणुकीसाठी खात्याच्या विवरणपत्राच्या स्वरुपात कन्सोलिडेटेड अकाऊंट स्टेटमेंट (CAS) पाठविते. हे होल्डिंग्ज पहिल्या धारकाच्या पॅनच्या आधारावर एकत्रित केलेले असतात.

II. महिन्यात व्यवहार झाला असल्यास हे विवरणपत्र दर महिन्यास पाठविले जाते. तुम्ही जर तुमचा इमेल आयडी आणि तुमची संमती डीपीला दिलेली असेल, तर तुम्हाला इ-मेल द्वारा विवरण पत्र पाठविले जाते.

III. तुमच्या डिमॅट खात्यांमध्ये आणि म्युच्युअल फंड फोलियोजमध्ये असलेल्या तुमच्या प्रत्येक गुंतवणुकीसाठी विवरण पत्राचा कालावधी आणि अखेरची शिल्लक तपासू शकता.

IV. हे विवरण पत्र तुमच्या प्रत्येक गुंतवणुकीची किंमत, एकंदर पोर्टफोलियोचे मूल्य आणि त्या कालावधीत पोर्टफोलियोच्या एकूण मुल्यामधील बदल दर्शविणारा आलेख देखील दर्शविते.

V. तसेच, यात केवायसी अद्ययावत आहे का, इमेल आयडी आणि तुमच्या म्युच्युअल फंड फोलियोज, इ.मध्ये उल्लेखित मोबाईल क्रमांक यांच्यासारखे इतर तपशील देखील दर्शविले जातात. तुम्हाला कोणतीही तफावत आढळली किंवा एखाद्या अपडेटची गरज असेल, तर तुम्ही म्युच्युअल फंड कंपनी किंवा तिच्या प्रबंधकाशी संपर्क साधू शकता.

VI. तुम्हाला जर विवरण पत्र मिळाले नाही किंवा तुम्हाला या विवरण पत्रात कोणतीही तफावत आढळली, तर कृपया तुमच्या डीपीशी त्वरित संपर्क साधा.

VII. एनएसडीएल (NSDL) डिमॅट खातेधारकाने थेट एनएसडीएल (NSDL) ला त्याचे इ-मेल id पुरवल्यास इ-मेल ने CAS मिळण्याची सुविधा https://nsdlcas.nsdl.com या वेबसाइटवर आणि आयडियाज मोबाईल अॅप वर उपलब्ध करून दिली आहे

STORABLE
SECURE
SWIFT
SIMPLE
CAS

हा क्यूआर कोड स्कॅन करून e-CASला आजच सबस्क्राइब करा

NSDL
Technology, Trust & Reach

## क. एक दूरदर्शी गुंतवणूकदार असणे

1) तुम्ही एक दूरदर्शी गुंतवणूकदार असल्याची खात्री करा. एक दूरदर्शी गुंतवणूकदार नेहमी

- सेबी शी नोंदणीकृत असलेल्या स्टॉकब्रोकर किंवा कोणत्याही गुंतवणुकीसाठी अधिकृत असलेल्या व्यक्तीसोबत व्यवहार करतो.
- स्वाक्षरी करण्यापूर्वी सर्व कागदपत्रे काळजीपूर्वक वाचतो.
- स्वाक्षरी केलेल्या कागदपत्रांची, खात्याच्या विवरणपत्रांची, मिळालेल्या कराराच्या नोट्सची आणि दिलेल्या पैशांची नोंद ठेवतो.
- आपल्या आर्थिक ध्येयांची आणि पोर्टफोलिओचा आढावा घेतो.
- परिणामकारकपणे लक्ष ठेवण्यासाठी मोबाईल नंबर आणि इमेल आयडीची नोंदणी करतो आणि मोबाईल ॲप, एनएसडीएल (NSDL) e-CAS, आयडियाजसारख्या एनएसडीएल (NSDL) सुविधांचा वापर करतो.
- म्युच्युअल फंड्सशी संबंधित कोणत्याही सेवेसाठी एएमएफआय नोंदणीकृत म्युच्युअल फंड वितरकासोबत व्यवहार करतो.
- नेहमी बँकिंग वाहिन्यांद्वारे गुंतवणूक करतो, म्हणजेच रोखीत व्यवहार करत नाही.

## 2) डिमॅट खात्याची काळजी घेणे

तुम्ही तुमच्या डिमॅट खात्यात मूल्यवान अशा गुंतवणुकी ठेवता. एनएसडीएल (NSDL) डिमॅट खात्याच्या विविध सेवांचा लाभ घेताना, तुमच्या गुंतवणुकी सुरक्षित राहतील याची खात्री करण्यासाठी काही मुलभूत बाबींची काळजी घेणे अतिशय महत्त्वाचे असते.

I. तुमच्या व्यक्तिगत माहितीत (उदा. पत्ता) किंवा तुमच्या डिमॅट खात्याशी संलग्न बँकेच्या खात्याच्या तपशीलात झालेल्या कोणत्याही बदलाला लिखित स्वरूपात त्वरित तुमच्या डीपीला कळवा आणि सिस्टीममध्ये त्याच्या सुधारणेची पुष्टी मिळवा.

II. तुमच्या डिमॅट खात्यातील नामांकन सुविधेचा लाभ घ्या. यामुळे खातेधारकाच्या मृत्युच्या प्रकरणी शेयर्सच्या हस्तांतरणाची प्रक्रिया सुलभ होते. तुम्ही तुमच्या डिमॅट खात्यात जास्तीत जास्त 3 नामनिर्देशित व्यक्तींचा उल्लेख करू शकता. नामनिर्देशित व्यक्ती(क्ती)ची नावे तुमच्या इच्छेनुसार कधीही बदलली जाऊ शकतात.

III. तुमचे डिमॅट खाते चालविण्यासाठी कोणालाही मुखत्यारपत्र देण्यापूर्वी, दिल्या जाणाऱ्या अधिकारांची हद्द आणि परिणाम यांचं काळजीपूर्वक परीक्षण करा.

IV. जर प्रत्येक स्लीप तुमच्या क्लायेंट आयडीसह एका अनुक्रमांकासह पूर्व छापिल असेल, तर तुमच्या डीपीकडून डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिप (डीआयएस) बुक अवश्य घ्या आणि ताब्यात सुरक्षित ठेवा. कोणत्याही कोऱ्या अर्जावर किंवा डीआयएसवर कधीही स्वाक्षरी करू नका. संपूर्ण अर्ज भरल्यानंतरच स्वाक्षरी करण्याचे लक्षात ठेवा.

V. थेट एनएसडीएल (NSDL)कडून SMS संदेश आणि नियमित अद्यतने मिळण्यासाठी खाते उघडण्याच्या अर्जात तुमच्या मोबाईल नंबरचा आणि इमेल आयडीचा उल्लेख करा. ही सुविधा तुमच्यासाठी नि:शुल्क आहे. तुमचा मोबाईल नंबर किंवा इमेल आयडी बदलल्यास, त्वरित लिखित स्वरूपात त्वरित तुमच्या डीपीला कळवा आणि सिस्टीममध्ये त्याच्या सुधारणेची पुष्टी मिळवा. यामुळे तुम्हाला एनएसडीएल (NSDL)कडून संदेश मिळत राहण्याची खात्री होईल.

VI. एनएसडीएल (NSDL)कडून इमेलद्वारा थेट तुमच्या सर्व गुंतवणुकीचे एकत्रित विवरण मिळविण्यासाठी https://nsdlcas.nsdl.com/ येथे एनएसडीएल (NSDL) इ-सीएसएसला सबस्क्राइब करा.

VII. एनएसडीएल (NSDL) तुम्हाला त्याची विविध उत्पादने / सेवा आणि डिपॉझिटरी सिस्टीमच्या इतर महत्त्वाच्या वैशिष्ट्यांविषयी अद्ययावत ठेवण्यासाठी एक मासिक बातमीपत्र 'द फायनान्शियल कॅलिडियोस्कोप' प्रकाशित करते.
कृपया https://nsdl.co.in/e-newsletter.php येथे तुमचा इमेल आयडी देत त्वरित सबस्क्राइब करा




या बातमीपत्राच्या मागील सर्व आवृत्त्या तुमच्या वाचण्यासाठी https://nsdl.co.in/publication/nest.php येथे उपलब्ध असतील.

# ड. आणखी माहिती

## 1. न मिळालेल्या डिव्हिडंड / शेअर्ससाठी रिफंडचा दावा करणे

कोणत्याही कारणास्तव सलग सात वर्षांसाठी शेयर धारकास न दिल्या गेलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व डिव्हिडंड आणि शेअर्स संबंधित कंपन्यांद्वारा इन्व्हेस्टर एज्युकेशन अँड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) ऑथोरिटीमध्ये हस्तांतरित केले जातात. आयईपीएफ ऑथोरिटी एक संविधानिक संस्था आहे, जिचे गठन कंपनी कायदा, 2013 च्या अंतर्गत झाले आहे. गुंतवणूकदार किंवा त्याच्या / तिच्या अधिकृत प्रतिनिधींना न दिलेल्या डिविडेंड आणि/किंवा दावा न केलेले शेयर्स मिळविण्यासाठी आयईपीएफ ऑथोरिटीकडे दावा करण्याची गरज असेल. दावेदाराने आयईपीएफ – 5 अर्ज डाऊनलोड करण्याची, त्याला भरण्याची आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे ऑनलाइन अपलोड करण्याची गरज असेल. तसेच, ऑनलाइन निर्माण झालेला दाव्याचा अर्ज आणि स्वीकृती छापली पाहिजे आणि त्याला प्रत्यक्ष रुपात संबंधित कंपनीद्वारा नियुक्त नोडल अधिकाऱ्याकडे आवश्यक अशा कागदपत्रांसह सादर केले पाहिजे. दाव्याच्या पडताळणीनंतर, कंपनी आयईपीएफ ऑथोरिटीकडे दाव्याची पुष्टी करते, जी नंतर दावेदाराला इलेक्ट्रॉनिक ट्रान्स्फरद्वारा त्याच्या / तिच्या जोडलेल्या बँकेच्या खात्यात रिफंड देण्याची प्रक्रिया सुरु करते. जर दावा भागांसाठी असेल, तर त्यांना दाव्याच्या अर्जात विनिर्दिष्ट डिमॅट खात्यामध्ये त्यांना जमा केले जाते. एक अर्जदार एका आर्थिक वर्षात प्रत्येक कंपनीसाठी एक दावा दाखल करु शकतो.

अधिक माहितीसाठी, कृपया http://www.iepf.gov.in/ वर भेट द्या. हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे की सर्व कंपन्यांनी दावा न केलेल्या शेअर्स आणि डिव्हिडंडच्या तपशिलांना त्यांच्या वेबसाईटवर प्रकाशित केले पाहिजे.

## 2. सिक्युरिटीजच्या हस्तांतरासाठी डिमॅट अनिवार्य

सेबीने 1 एप्रिल 2019 पासून सूचीबद्ध कंपन्यांच्या सिक्युरिटीजच्या सर्व हस्तांतरणांना केवळ डिमॅट स्वरूपात करावे असे अनिवार्य केले आहे. दुसऱ्या शब्दांमध्ये, तुमच्याकडे एखाद्या सूचीबद्ध कंपनीचे शेअर्स कागदोपत्री स्वरूपात असतील आणि तुम्हाला दुसऱ्यांना हस्तांतरित करावयाचे असतील, तर तुम्ही ते 1 एप्रिल 2019 पासून केवळ डिमॅट स्वरूपात रुपांतरित केल्यानंतरच करु शकाल. या तारखेपासून, शेअर इ.साठी प्रेषण (म्हणजे शेअरहोल्डरच्या मृत्युच्या प्रकरणी शेअर्सचे हस्तांतरण) आणि स्थानपरिवर्तन (म्हणजे शेअरहोल्डर्सच्या नावांच्या क्रमात बदल) केवळ कागदोपत्री स्वरूपात असलेल्यांसाठी अनुमत असेल. त्यामुळे एक डिमॅट खाते उघडणे आणि तुमचे शेअर्स शक्य तितक्या लवकर डिमॅटमध्ये रुपांतरित करणे फायद्याचे राहील.

### 3. अनलिस्टेड सार्वजनिक कंपन्यांसाठी डिमॅट अनिवार्य

मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्सने (एमसीए) 10 सप्टेंबर 2018 रोजी एक अधिसूचना जारी केली होती, ज्यात असा उल्लेख केला होता की अनलिस्टेड सार्वजनिक कंपन्यांनी डिपॉझिटरी सिस्टीममध्ये सामील झाले पाहिजे आणि त्यांचे शेअर्स डिमॅटसाठी उपलब्ध केले पाहिजेत. या कंपन्यांद्वारे पुढील शेअर्सचे जारी करणे केवळ डिमॅट स्वरूपात असेल. या दोन्ही आवश्यकता 2 ऑक्टोबर 2018 पासून लागू आहेत. अशा कंपन्यांमधील धारक त्यांच्या होल्डिंग्जना डिमॅट स्वरूपात रूपांतरित करू शकतात आणि संबंधित फायदे मिळवू शकतात. गुंतवणूकदारांच्या दृष्टिकोनातून, त्यांना अशा अनलिस्टेड कंपन्यांमध्ये डिमॅट स्वरूपातील त्यांच्या होल्डिंग्जना रूपांतरीत करणे शक्य होईल आणि संबंधित फायदे मिळतील. याची नोंद घ्या की तुमच्याकडे अगोदरपासूनच एक डिमॅट खाते असेल, तर हे शेअर्स प्राप्त करण्यासाठी तुम्हाला दुसरे डिमॅट खाते उघडण्याची गरज नाही. कागदोपत्री स्वरूपात असलेली तुमची गुंतवणूक, या अटीवर की त्या होल्डिंगचा प्रकार सारखाच असेल, तर त्याच डिमॅट खात्यामध्ये डिमॅट स्वरूपात रूपांतरित केली जाऊ शकेल.

### 4. गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रम

एनएसडीएल (NSDL) संपूर्ण देशभर गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करते. अशा कार्यक्रमांचे वेळापत्रक https://nsdl.co.in/Investor-Awareness- Programmes.php येथे उपलब्ध असते. तुम्हाला तुमच्या हाऊसिंग सोसायटीमध्ये, संस्थेमध्ये, कंपनीमध्ये किंवा शहरात गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे असेल, तर आम्हाला info@nsdl.co.in वर लिहा.

### 5. तक्रार निवारण

तुमच्या डिमॅट खात्याच्या संदर्भात तुम्हाला कोणतीही तक्रार असेल, तर कृपया आम्हाला relations@nsdl.co.in येथे लिहा किंवा तुम्ही याला सेबीसह ऑनलाइन https://scores.gov.in/scores/Welcome.html येथे तक्रार करू शकता.

### 6. एनएसडीएल (NSDL) ची 100% उपकंपनी असलेल्या एनडीएमएलच्या इतर उपयुक्त सेवा

I. नॅशनल स्कील रजिस्ट्री (NSR): एनएसआर एक वेबवर आधारित यंत्रणा आहे, ज्यात भारतीय आयटी आणि आयटीइएस / बीपीओ उद्योगात कार्यरत आणि संभावित कर्मचाऱ्यांविषयी माहितीचा एक डेटाबेस आहे. हा एक नास्कॉम उपक्रम आहे. अधिक माहितीसाठी, कृपया भेट द्या https://naonalskillsregistry.com/.

II. केवायसी रजिस्ट्रेशन एजन्सी (KRA) : गुंतवणूकदारांच्या केंद्रीकृत केवायसी नोंदी अपलोड करा आणि डाऊनलोड करा. अधिक माहितीसाठी, कृपया भेट द्या https://kra.ndml.in/.

III. नॅशनल अकॅडेमिक डिपॉझिटरी (NAD) : विद्यार्थी, पडताळक आणि अकॅडेमिक इंस्टिट्यूशन यांना पाहता येतील असे डिजिटाइज्ड ऑथेंटिक अकॅडेमिक सर्टिफिकेट्स. अधिक माहितीसाठी, कृपया भेट द्या https://nad.ndml.in/.

IV. एनआयआर खाते (इ-इन्शुरन्स अकाउंट): एनडीएमएलने भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरणाच्या (IRDAI) वतीने एका इन्शुरन्स रिपॉझिटरीची स्थापना केली आहे. यामुळे सर्व प्रकारच्या विमा पॉलिसींना एकाच इ-इन्शुरन्स अकाउंटमध्ये (e-IA) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात राखण्याची सुविधा मिळते आणि यामुळे विमेदार सर्व विमा पॉलिसीज एकाच लॉगीनमध्ये एक्सेस करू शकेल. हे खाते मोफत उघडले जाऊ शकते. अधिक माहितीसाठी, कृपया भेट द्या https://www.nir.ndml.in/.

NATIONAL SECURITIES DEPOSITORY LIMITED

NSDL
Technology, Trust & Reach

# प्रतिक्रिया अर्ज

(तुम्ही आमच्या गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रमास उपस्थित राहिलात, तर तुम्ही हा अर्ज भरला पाहिजे.)

**तारीख:** DD MM YYYY **स्थान- :**

| कार्यक्रमाचे तपशील | निकृष्ट | समाधानकारक | चांगले | उत्कृष्ट |
|---|---|---|---|---|
| या कार्यक्रमासाठी केलेल्या व्यवस्था तुम्हाला कशा वाटल्या? | | | | |
| दिलेल्या साहित्याची गुणवत्ता | | | | |
| सत्र 1 साठी प्रशिक्षकाचे मुल्यांकन – नाव: | | | | |
| अ. विषयाचे ज्ञान | | | | |
| ब. संवाद आणि प्रस्तुती | | | | |
| क. प्रेक्षकांशी हितगुज | | | | |
| सत्र 2 साठी प्रशिक्षकाचे मुल्यांकन – नाव | | | | |
| अ. विषयाचे ज्ञान | | | | |
| ब. पत्रव्यवहार आणि प्रस्तुती | | | | |
| क. प्रेक्षकांशी हितगुज | | | | |

- गुंतवणूकदार जागरूकता कार्यक्रमाविषयी तुम्हाला माहिती कशी व कुठून मिळाली? कृपया योग्य चौकासमोर खुण करा.

☐ ईमेल ☐ एसएमएस ☐ वृत्तपत्र ☐ अन्य ........................................

- हा कार्यक्रम अधिक चांगला करण्यासाठी तुमच्या सूचना?

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

- तुम्हाला आमचे बातमीपत्र 'द फायनान्शियल कॅलिडियोस्कोप' प्राप्त करायचे असेल, तर कृपया तुमचा इमेल आयडी कळवा

------------------------------------------------------------

नाव: ........................................ मोबाइल नंबर: ........................................

NATIONAL SECURITIES DEPOSITORY LIMITED

**NSDL**
Technology, Trust & Reach

(कृपया हा अर्ज भरा आणि आम्हाला द्या / पाठवा)

**1.तुमच्याकडे डिमॅट खाते आहे का?**

☐ होय ☐ नाही

**2.नसल्यास, तुम्हाला डिमॅट खाते उघडायचे आहे का?**

☐ होय ☐ नाही

**3.जर असल्यास, डिमॅट खाते उघडण्यासाठी आमच्या एका डीपीने तुमच्याशी संपर्क साधावा का?**

☐ होय ☐ नाही

**4.तुम्ही तुमचे म्युच्युअल फंड्स युनिट्स डिमॅट स्वरूपात बदलू शकता याची तुम्हाला जाण आहे का?**

☐ होय ☐ नाही

**5.कतुम्ही म्युच्युअल फंड्स थेट डिमॅट स्वरूपात खरेदी करू शकता याची तुम्हाला जाण आहे का?**

☐ होय ☐ नाही

**6.एनएसडीएल (NSDL) डिमॅट स्वरूपात असलेल्या तुमच्या सर्व गुंतवणुकी आणि म्युच्युअल फंड युनिट्सचे तपशील असलेले कन्सोलिडेटेड अकाऊंट स्टेटमेंट पाठवते याची तुम्हाला माहिती आहे काय?**

☐ होय ☐ नाही

# एनएसडीएल के निवेशक-केन्द्रित उत्पाद एवं सेवाएँ

## i) एनएसडीएल आयडियाज

अद्ययावत होल्डिंग्ज आणि मुल्यांकन ऑनलाइन पाहण्यासाठी गुंतवणूकदारांसाठी सुविधा
क्यूआर कोड स्कॅन करा किंवा खालील लिंकला भेट द्या
https://eservices.nsdl.com

## ii) एनएसडीएल (NSDL) मोबाईल ॲप

कोणत्याही, वेळी कुठूनही होल्डिंगचे विवरण पाहण्यासाठी मोबाईल ॲप. ॲप डाऊनलोड करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा

**गुगल प्ले स्टोअर आणि ॲपल ॲप स्टोअरवर उपलब्ध.**

**प्लेस्टोअरसाठी**

https://play.google.com/store/apps/details?id=com.msf.NSDL.Android

**ॲप स्टोअर**

https://itunes.apple.com/in/app/nsdl/id922834763?mt=8

## iii) नॅशनल इन्शुरन्स रिपॉझिटरी (NIR) (एनआईआर)

सर्व इन्शुरन्स पॉलिसीजसाठी नि:शुल्क इ-इन्शुरन्स अकाऊंट. म्हणजेच, लाईफ आणि नॉन-लाईफ एकाच ठिकाणी.
आजच एक नि:शुल्क इ-इन्शुरन्स अकाऊंट उघडा!
क्यूआर कोड स्कॅन करा किंवा खालील लिंकला भेट द्या
https://nironline.ndml.in/NIR/onlineEiaApplicationFormEkyc.html

## iv) नॅशनल ॲकेडमिक डिपॉझिटरी (NAD)

शैक्षणिक प्रमाणपत्रे पाहण्यासाठी नि:शुल्क ऑनलाइन स्टुडंट अकाऊंट.
नि:शुल्क एनएडी खाते आजच उघडा! क्यूआर कोड स्कॅन करा किंवा खालील लिंकला भेट द्या
https://nad.ndml.in/NAD/newStudentRegistrationScreen.html

**टिप्पण**

# मुख्य कार्यालय

## मुंबई

4था मजला, 'ए' विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल,
मुंबई -400013 फोन – (022) 2499 4200 इमेल: info@nsdl.co.in

# शाखा कार्यालय

## अहमदाबाद

402, 4था मजला, हेरिटेज हॉरिझॉन, सी. जी. रोडजवळ, नवरंगपुरा, अहमदाबाद- 380009
फोन – (079) 2646 1375

## बेंगळूरु

ऑफिस नं. 106, डीबीएस हाऊस 26, कनिंघम रोड, बेंगळूरु – 560052
फोन – (80) 40407106

## चेन्नई

6ए, 6वा मजला, केंसीस टावर्स, #1 रामकृष्ण स्ट्रीट, नॉर्थ उस्मान रोड, टी. नगर, चेन्नई – 600017
फोन – (044) 2814 3917 /11

## हैदराबाद

ऑफिस नं. 123, हैदराबाद रेगस मिड-टाउन, 1ला मजला, मिड टाउन प्लाझा, रोड नं. 1, बंजारा हिल्स,
हैदराबाद – 500033, फोन – (040) 44334178

## कोचि

सूट नं. एस – 105, मोनलॅश बिझनेस सेंटर, 4था मजला, फ्रीसेन्स टॉवर, एनएच 47, चंगमपुझा नगर पोस्ट,
कोचि – 682033 फोन – (0484) 2933075

## कोलकाता

युनिट 2ई, 2रा मजला, द मिलेनियम, 235/2ए, ए.जे.सी. बोस रोड, कोलकता – 700020
फोन – (033) 22904243 / (033) 22904246

## नवी दिल्ली

युनिट नं. 601, 603, 604, 6वा मजला, टावर – ए, नौरंग हाऊस, कस्तुरबा गांधी मार्ग, कॉन्नौट प्लेस,
नवी दिल्ली – 110001

---

**इन्व्हेस्टर रिलेशनशिप सेल**
ईमेल : relations@nsdl.co.in

November - 2019

**इन्व्हेस्टर हेल्पलाईन (टोल फ्री) 1800 222 990**
www.nsdl.co.in